दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार १९ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# न्यायालयाची दिशाभूल व मयत बहिणीच्या वारसांना डावळून साडेबारा टक्के भूखंड लाटण्याचा प्रयत्न



**दैनिक वादळ वार्ता**
**उरण /विठ्ठल ममताबादे**

न्यायालयात एका वारस दाखल्यांचे काम प्रलंबित असताना मयत मुलीच्या वारसांना डावलून न्यायालयातुन त्याच वारसांनी नवीन दाखला तयार करून घेतला आहे.न्यायालयाची दिशाभूल करून नवीन वारस दाखल्याच्या आधारावर बिल्डरबरोबर साडेबारा टक्के भूखंड विक्रीच्या प्रयत्न चालविल्याची तक्रार करण्यात आली आहे.मात्र सिडकोचेच काही भ्रष्ट अधिकारी या तक्रारींकडे दुर्लक्ष करून संगनमताने बिल्डरांच्या फायद्यासाठी भुखंड विक्रीस हातभार लावीत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.न्यायालयाची दिशाभूल करुन मयत बहिणीच्या वारसांना डावळून साडेबारा टक्के भूखंड लाटण्याचा प्रयत्न करण्याच्या या प्रकाराची मात्र परिसरात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

धुतुम ग्रामपंचायत हद्दीत राहाणारे रामा लहू ठाकूर हे गृहस्थ २०१६ मध्ये मयत झाले आहेत.त्यांच्या पश्चात दोन मुले आणि चार मुली असे वारस आहेत. दरम्यान त्यांची मुलगी कुंदा ठाकूर यांचेही २०१७ साली निधन झाले आहे.दरम्यान जमिन संपादनाच्या मोबदल्यात सिडकोकडून साडेबारा टक्के विकसित भुखंड मिळणार आहेत.त्यासाठी वडिल आणि बहिणीच्या मृत्यूनंतर कायदेशीर वारस असलेल्या अंकुश ठाकूर, अशोक ठाकूर,श्रीमती नंदा ठाकूर, श्रीमती सुरेखा ठाकूर,श्रीमती अंजली ठाकूर व मयत कुंदा ठाकूर यांचे वारस पुजा घरत, सन्नी ठाकूर, प्रितम ठाकूर, अश्विनी ठाकूर आदी वारसांनी वारस दाखला मिळण्यासाठी उरणच्या दिवाणी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.२०१९ साली वारसा दाखल्यांसाठी केलेला अर्ज न्यायालयात अद्यापही प्रलंबित आहे. मात्र वारस दाखला प्रलंबित असतानाही अंकुश ठाकूर, अशोक ठाकूर,श्रीमती नंदा ठाकूर, श्रीमती सुरेखा ठाकूर,श्रीमती अंजली ठाकूर आदी वारसांनी मयत कुंदा ठाकूर यांचे वारस पुजा घरत, सन्नी ठाकूर, प्रितम ठाकूर, अश्विनी ठाकूर आदी वारसांना डावलून २०२० मध्ये उरण न्यायालयात वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केला होता. न्यायालयानेही वारस दाखला कुंदा ठाकूर यांचे वारस पुजा घरत, सन्नी ठाकूर, प्रितम ठाकूर, अश्विनी ठाकूर आदी वारसांना डावलून वारस दाखला दिला आहे. न्यायालयाची दिशाभूल करुन मिळालेल्या वारस दाखल्याच्या आधारावर त्यांनी सिडकोकडे साडेबारा टक्के विकसित भुखंड मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

याची माहिती मिळताच मयत कुंदा ठाकूर यांच्या वारसांनी सिडकोकडे तक्रार करून साडेबारा टक्के भूखंडांचे वाटप करु नये अशी विनंती केली आहे.

मात्र सिडकोचेच काही भ्रष्ट अधिकारी या तक्रारींकडे दुर्लक्ष करून संगनमताने बिल्डरांच्या फायद्यासाठी भुखंड विक्रीस हातभार लावीत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. न्यायालयाची दिशाभूल करुन मयत बहिणीच्या वारसांना डावलून साडेबारा टक्के भूखंड लाटण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रकरणाची परिसरात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.याप्रकरणी अन्याय झालेल्या वारसांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

# अंबाजोगाईचे तरुण लदाख येथे सुखरुप : बर्फवृष्टी मुळे अडकले

**वादळवार्ता/ अंबाजोगाई**



येथील विजय बेले यांच्यासह दोन जण तरुण देवदर्शनासाठी, पर्यटनासाठी लदाख येथे गेले होते. दरम्यान, त्या ठिकाणी जोगीला पास येथे मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी झाल्याने त्या परिसरातील रस्ते ब्लॉक झाले होते. त्यामुळे गेल्या चार - पाच दिवसांपासून विजय बेले व त्यांचे सहकारी त्या परिसरात अडकले होते अशी माहिती समोर आली होती. परंतू, लदाख येथे विजय बेले आणि त्यांचे सहकारी सुखरूप आहेत अशी माहिती खुद्द विजय बेले यांनी समाजमाध्यमांच्याद्वारे दिली आहे. बर्फवृष्टीमुळे ब्लॉक झालेले रस्ते प्रशासनाने सुरळीत चालू केले असून लवकरच आम्ही 'त्या' ठिकाणावरून सुखरूप बाहेर पडणार आहोत, अशी माहिती विजय बेले यांनी दिली आहे. येत्या तीन - चार दिवसांत ते अंबाजोगाई शहरात परत येतील, अशी माहिती विजय बेले यांच्या मित्रपरिवाराने दिली आहे..

# पिता बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ पुत्र सौरव सोनवणे मैदानात; सुरु झाला गाव भेटीचा झंझावाद



**माळेगाव/सचिन भालेराव** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व इंडिया आघाडीचे ३९ बीड लोकसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार श्री बजरंग मनोहर सोनवणे यांच्या प्रचारार्थ त्याचे पुत्र सौरव बजरंग सोनवणे यांनी गाव भेटीचा झंझावाद सुरू केला आहे ते आज गाव भेट दौऱ्याच्या निम्मिताने माळेगावला त्यांनी भेट दिली.सर्वप्रथम खंडोबा मंदिरात प्रवेश करून दर्शन घेतले .गावातील सर्व गावकरी गट तट विसरून सौरव सोनवणे यांचे स्वागत केले. सौरव सोनवणे यांनी गावकऱ्याशी संवाद साधला ते म्हणाले येडेश्वरी साखर कारखाना उभा करून शेतकऱ्यांना चांगला भाव दिला, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार तरुण आणि शेतकऱ्यांच्या शब्दाला वाचा फोडण्यासाठी आपला हक्काचा, तळागाळातील कामे करणारा आपला हक्काचा माणूस संसदेत पाठवा. असे अवाहन यावेळी करण्यात आले . यावेळी मोठया संख्येने गावकरी वर्ग उपस्थित होता.

# प्राथमिक शाळेतील संस्कार मोलाचे-नेताजीराव चौगले

**कुडूत्री/सुभाष चौगुले**

प्राथमिक शाळेत मिळणारे संस्कार हे प्रत्येक माणसाच्या आयुष्यात मोलाचे असतात .इथूनच प्रत्येकाच्या आयुष्याला कलाटणी मिळत असते .त्यामुळे सर्वांनी आपल्या प्राथमिक शाळेचे योगदान विसरू नये .असे प्रतिपादन श्री. नेताजीराव चौगले यांनी केले. तारळे खुर्द येथील केंद्र शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या सदिच्छा समारंभात ते बोलत होते.

यावेळी व्यवस्थापन समितीच्या सदस्या विद्या पाटील,वंदना सावंत, राजश्री पाटील,सविता भोसले, मुख्याध्यापक एस. वाय. पाटील सर इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेविषयीचे आपल्या आदर भावना व्यक्त केल्या .याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री एस वाय पाटील सर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त शाळेतील विद्यार्थ्यां मार्फत भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार संपन्न झाला .इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनीही शाळेला भेट वस्तू देऊन आपल्या शाळेविषयी ऋण व्यक्त केले. यावेळी वर्गशिक्षिका सौ सारिका पाटील मॅडम ,श्री संजय जाधव सर ,श्री प्रकाश पाटील सर ,श्री प्रकाश पवार सर यांनी आपल्या मनोगततून विद्यार्थ्यांना भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या .या कार्यक्रमात शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी आठवी एन एम एम एस परीक्षेत उज्वल यश मिळवल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचाही



सत्कार संपन्न करण्यात आला .यावेळी शाळेतील इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी रोही अनिल पाटील हीच्या वाढदिवसानिमित्त तिच्या पालकांच्याकडून शाळेला लाकडी टीपॉय भेट देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षदा कांबळे व अवंतिका गुरव यांनी केले .स्वागत समीक्षा पाटील ने केले तर प्रास्ताविक राजनंदनी पाटील हिने केले. स्मिता जाधव यांनी आभार प्रदर्शन केले .

# प्रा.ईश्वर मुंडे यांचे मोफत हरी किर्तन संपन्न

**वादळवार्ता/केज**

अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणजे काय आसते ते धारूर तालुक्यांतील गांजपूर चे सुपुत्र प्रा. ईश्वर आनंदराव मुंडे यांचे कडे पाहील्यावर समजते. शैक्षणिक,सामाजिक, साहित्यीक,क्रीडा,ग्रंथालय,पर्यावरण व राजकीय अशा क्षेत्रात मोलाचे कार्य करत असलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी मागील दोन वर्षापासूनअध्यात्मिक क्षेत्राची पताका आपल्या खांद्यावर घेत हरी किर्तन करत या क्षेत्रात ही आपला ठसा उमटवला आहे. वर्ष २२ वे अखंड हरीनाम सप्ताह, बानेगाव ता.केज येथे दि.१७/ ४/२०२४ बुधवार रोजी जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा या अभंगांवर हरी किर्तन संपन्न झाले. आई-वडील परमार्थिक असलेल्या प्रा. ईश्वर मुंडे यांना बाल पणापासूनच अध्यात्मिक क्षेत्राची आवड होती. एम.ए.(मराठी) बी.एड शिक्षण झालेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांचा संत वाङ्गमयाचा ही चांगला अभ्यास आहे. आपला अभ्यास व गोड आवाजातील निरूपन यामुळे त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.




विशेष म्हणजे प्रा.ईश्वर मुंडे यांनी विनामूल्य किर्तन सेवा करून अध्यात्मिक क्षेत्रात आपला एक आदर्श ठेवला आहे. किर्तन सेवेसाठी मृदंगाचार्य तुळशीराम उबाळे,हार्मोनियम सर्जेराव मोराळे गायनाचार्य नामदेव क्षीरसागर, भरत महाराज,माऊली सानप,अनिल जोशी व गुरूकुलातील विद्यार्थी यांनी साथ संगत केली. बानेगाव येथील नंदकुमार मोराळे,संजीवन गोपाळघरे,सर्जेराव मोराळे,तुकाराम आंधळे व समस्त गावकऱ्यांच्या प्रयत्नाने प्रा.ईश्वर मुंडे यांची किर्तन सेवा संपन्न झाली.

# बजरंग सोनवणेंच्या अर्धांगिनी उतरल्या प्रचारात

## सारिकाताई सोनवणेंनी घेतली केजमध्ये महिलांची कॉर्नर बैठक

**वादळवार्ता/केज**बीड लोकसभेचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी उमेदवारी जाहीर होताच जिल्ह्यात गाठीभेटी सुरू केल्या आहेत. त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापुर्वी प्रत्येक तालुक्यातील अनेक गावांना भेटी दिल्या असून प्रत्येक गावात अभूतपूर्व स्वागत व नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. तर त्यांच्या अर्धांगिनी जिल्हा परिषद सदस्या सारीकाताई सोनवणे या प्रचारात उतरल्या आहेत. त्यांनी शहरातील क्रांतीनगर भागात महिलांची कॉर्नर बैठक घेतली.

मागील लोकसभेच्या निवडणुकीत निसटत्या मतांनी पराभव झालेल्या बजरंग सोनवणे यांनी मतदारांचा सन्मान राखण्यासाठी पुन्हा निवडणुकीच्या मैदानात उडी घेतली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून उमेदवारी जाहीर होताच बजरंग सोनवणे यांनी पायात भिंगरी बांधून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात जाऊन जास्तीत जास्त मतदारांशी कसा संवाद साधता येईल. असे तालुका निहाय प्रचार दौऱ्याचे नियोजन करीत भेटीगाठीवर भर दिला आहे. काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या प्रमुख पक्षांच्या नेत्यांचे आशीर्वाद आणि मित्र पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याचे दौरे सुरू आहेत. मतदार संघातील अनेक गावात प्रचार दौरे करीत जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गावांमध्ये ग्रामदैवत, विविध देव देवतांच्या मंदिरात जाऊन दर्शन घेत व महापुरुषांच्या नावे असलेल्या चौकात पुष्पहार अर्पण व अभिवादन करीत कॉर्नर बैठका, मतदारांच्या संवाद साधून त्यांनी जिल्ह्यातील वातावरण ढवळून काढले आहे. गावा - गावात नागरिकांकडून होत असलेले अभूतपूर्व स्वागत, महिलांकडून औक्षण आणि नागरिकांचा चांगला प्रतिसादाने त्यांचा उत्साह वाढला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांनी तालुका निहाय झंझावाती दौरे काढून कडक उन्हात गावा - गावाना भेटी देत नियोजनबद्ध प्रचार सुरू आहे. बजरंग सोनवणे यांचे प्रचार दौरे सुरु असताना



त्यांच्या अर्धांगिनी जिल्हा परिषद सदस्या सारीकाताई सोनवणे या प्रचारात उतरल्या आहेत. गेल्या निवडणुकीत त्यांनी प्रचाराची धुरा सांभाळत महिला मतदारांतून चांगला प्रतिसाद मिळविला होता. या निवडणुकीत त्यांनी प्रचाराला सुरुवात केली असून केज शहरात नगरपंचायतीच्या प्रभाग क्र. १ पासून सुरुवात केली आहे. या प्रभागातील क्रांती नगर भागात महिलांची कॉर्नर बैठक घेत महिलांशी संवाद साधला. महिला मतदारांच्या अडीअडचणी जाणून घेत त्यांनी बजरंग सोनवणे यांना मत देण्याचे आवाहन केले. यावेळी महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा शीतल लांडगे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

संपादकीय

## दे जीवना मला तू आता नवी निराशा

...सुरेश भट

भट साहेबांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला काल डोंबिवली येथे 'गझलभान' हा सुंदर गझल मैफलीचा कार्यक्रम झाला. गणेश कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून आणि संयोजनातून हा कार्यक्रम सादर झाला. चंद्रशेखर सानेकर सरांच्या उत्कृष्ट अशा सूत्रसंचालनाने कार्यक्रम खूपच शानदार झाला. सारंग पंपटवार, स्वप्नील शेवडे, रत्नमाला शिंदे,कैलास गांधी आणि डोंबिवलीतील चित्रकार-गझलकार गोविंद नाईक यांच्या सहभागाने कार्यक्रम खरच खूप बहारदार झाला. गझल ही तशी आपल्या आवाक्या बाहेरची गोष्ट! पण गझल मैफिलीत बसल्यावर गझलेचे एका एका शेरावर जेव्हा वाह..क्या बात! मुकर्रर!!बहोत अच्छे!वाह..!!अशी रसिकांची प्रतिक्रिया ऐकतो तेव्हा आपणही त्यात कधी सामील होऊन जातो कळतच नाही. रदिफ,काफिया, अलामत, वृत्त, मतला,शेर,मुरद्दफ,गैरमुरद्दफ अशा अनेक तांत्रिक गोष्टींतून गझलेत जेव्हा गझलीयत आलेली असते तेव्हा ती गझल ऐकणाऱ्या प्रत्येकाची झालेली असते. हे गझल मैफलीत गेल्यावरच कळते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने एक गोष्ट जाणवली ती म्हणजे गझल लिहीताना खूप तांत्रिक गोष्टी शिकाव्या लागतात. सहज ती प्राप्त होत नाही. गझल लिहीणारा खूप अनुभवी कवी असायला हवा किंवा जीवनाचा मोठा अनुभव गाठीशी असायला हवा अशी माझी समजूत होती पण या कार्यक्रमात सारंग,स्वप्नील,रत्नमाला या खूपच तरूण मुलांनी गझला सादर केल्या ते पाहून माझा समज गळून पडला. गझल आता तरूण कवींची आवड बनली आहे हे पाहून भट साहेबांनी लावलेले छोटेसे झाड आता वृक्ष बनत चालले आहे हे मात्र नक्की झाले आहे. असे कार्यक्रम वरचेवर व्हायला हवेत आणि मोठमोठ्या गझलकारां सोबत तरूण गझलकारांनाही स्टेज शेअर करण्याची संधी मिळायला हवी.त्यामुळे भविष्यात मराठी साहित्य क्षेत्रात अनेक कवी-गझलकार नावा रूपाला येतील.

जयेश अ. माधव

भगवान श्रीरामाचा जन्मदिवस संपूर्ण भारतभर उत्साहात साजरा केला जात असला तरी विशेषतः श्रीराम जन्मभूमी असलेल्या अयोध्येत हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. श्रीराम नवमीच्या वेळी अयोध्येत भव्य भक्तमेळा आयोजित केला जातो, ज्यामध्ये दूरदूरच्या भक्तांव्यतिरिक्त, भिक्षू आणि संन्यासी देखील पोहोचतात आणि श्रीराम जन्म साजरा करतात. सामान्यतः श्रीराम नवमीच्या दिवशी हिंदू कुटुंबांमध्ये उपवास, पूजा आणि इतर धार्मिक विधी आयोजित केले जातात. श्रीरामजींच्या जन्माच्या वेळी त्यांच्या जयंतीचे आयोजन करून त्यांचे जल्लोषात स्वागत केले जाते. अनेक घरांमध्ये विशेष सजावट केली जाते, घराला पवित्र करून कलशाची स्थापना केली जाते आणि प्रभू श्रीरामजींची पूजा करून भजन-कीर्तन केले जाते. विशेष म्हणजे या दिवशी श्रीराम, माता जानकी आणि लक्ष्मणजी यांचीही पूजा केली जाते.

माता कैकेयीने श्रीरामाचे वडील राजा दशरथ यांच्याकडून वरदान मागितल्यावर श्रीरामांनी राजवाडा सोडून १४ वर्षांचा वनवास आनंदाने स्वीकारला आणि वनवासात असतानांच अनेक राक्षसांसह अहंकारी रावणाचा वध करून सोन्याची लंका जिंकली. अयोध्या सोडताना माता जानकी आणि भाऊ लक्ष्मण हेही श्रीरामांसोबत १४ वर्षे वनवासात गेले. यामुळेच श्रीराम नवमीला श्रीरामांसोबत त्यांचीही पूजा मोठ्या भक्तिभावाने केली जाते.

|| सर्व भारतीयांना पावन श्रीराम नवमी निमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा ||

- संकलन व शब्दांकन -
संतचरणरज:
बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
पोटेगावरोड, गडचिरोली.
फक्त मधुभाष-

# विठ्ठल नामातच मातीत मूल तुडविले!

यातील आख्यायिकेच्या मागे चमत्काराचा भाग असलेला दिसून येतो. संतांच्या चरित्रात असे अनेकविध चैतन्याचे चमत्कार वर्णिलेले आहेत. चमत्काराचे चैतन्य असते. पण बऱ्याचदा समृद्ध समाजाला अशा चमत्कारातून चेतना मिळण्याऐवजी त्यांच्या ठिकाणी अंधश्रद्धा बळावताना दिसते. संतांचे जीवनदर्शन घडविताना सुद्धा केवळ चमत्कार हे त्यांचे साध्य नव्हते तर साधन होते, याचे भान राखावे. म्हणून फक्त तो त्यांच्या जीवनातील एक चमत्काराचा भाग समजावा. फार तर त्याचा सरळ सरळ अर्थ घेणे योग्य नाही. याबाबत असे म्हणता येईल की माधवबुवा धार्मिक व सहिष्णुवृत्तीचे होते. काळेश्वरावर त्यांची निस्सीम श्रद्धा व भक्ती होती. सात मुले एका मागोमाग गेली परंतु आठवा मुलगा गोरोबा जिवंत राहिला. म्हणून माधवबुवांना तो आपल्या श्रध्देचा, भक्तीचा, महिमा वाटला. यावरुन एवढाच तर्क करता येतो किंवा अंदाज बांधता येतो की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गारोबांचा जन्म झाला आहे. सदर लेख श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या शब्दांत जरूर वाचा... संपादक.

माधवबुवांना आठ मुले झाली, पण ती जगत नव्हती. त्यांनी आपली सर्व मुले काळेश्वराजवळील स्मशानातील गोरीत पुरली होती. ती सर्व मुले जिवंत कशी झाली? यासंबंधी एक आख्यायिका संत गोरोबा काका चरित्रामध्ये महादेव बाळाजी कुंभार यांनी सांगितली आहे. ते आपल्या चरित्रामध्ये म्हणतात, की श्री माधवबुवा तेर येथील काळेश्वराची उपासना करीत होते. पुढे कालांतराने परमात्मा पांडुरंग ब्राह्मणाचा वेष घेऊन त्यांचे घरी आले. तेव्हा खिन्न मुद्रा पाहून देवाने त्यांना विचारले, की दुःखी का? माधबुवांनी सांगितले, की आपली आठही मुले देवाने नेली. नंतर देवाने आठ मुलांना जेथे मूठमाती दिली, ती जागा दाखविण्यास सागितले. माधवबुवांनी काळेश्वर जवळील स्मशानात नेले व देवास आठही मुले पुरलेली जागा दाखविली. देवाने सर्व मुलांची प्रेते उकरण्यास सांगितली. बुवांनी त्याप्रमाणेच केले. देवाने पाहिले व सात मुलांना आपल्या हाताच्या स्पर्शाने जिवंत करून त्यांना स्वर्गात पाठविले. नंतर आठवा मुलगा जिवंत केला. तोही स्वर्गाच्या मार्गाने निघाला. परंतु देवाने त्यास जाऊ दिले नाही. भगवंताने त्याला आपल्या हातात घेऊन माधवबुवा व रखुमाईच्या स्वाधीन केले. त्यास गोरीतून काढले, म्हणून देवाने त्याचे नाव गोरोबा ठेवले. संतश्रेष्ठ गोरोबाकाका कुंभार हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत होते. ते संत नामदेव व संत ज्ञानेश्वरांचे समकालीन मानले जातात. तज्ज्ञांच्या मते शा.श. ११८९ अर्थात इ.स.१२६७ साली त्यांचा जन्म झाला असावा. त्यांनी अनेक अंभग लिहिले आहेत. ते विठ्ठलाचे- पांडुरंगाचे मोठे भक्त होते. तेर नगरीत गोरोबांच्या घराण्याची परंपरा धार्मिक व सदाचारी वृत्तीची होती. तेथील काळेश्वर या ग्रामदैवतांचे त्यांचे घराणे उपासक होते. दोघे नवराबायको कुंभारकाम व काबाडकष्ट करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. सदाचारी, सच्छिल वृत्तीमुळे तेरगावात माधवबुवांना संत म्हणून गावकरी ओळखत होते.

गोरोबांच्या मनावर बालपणापासूनच भगवद्भक्तीचे संस्कार झाले होते. त्यांना लेखन-वाचन येत होते. संत ज्ञानदेव, संत नामदेव यांच्या पूर्वकाळात पंढरपूर हे शिव उपासकांचे- भक्तांचे केंद्र होते. अनेक शिवभक्त त्याठिकाणी आपली साधना करीत होते. ते भक्त, योगी, सिद्ध व साधकही होते. गोरोबाकाका जेव्हा जेव्हा पंढरपूरला जात, तेंव्हा त्यांना या सिद्ध पुरुषांचे दर्शन होई. त्यांच्या योगसाधनेचे त्यांना कौतुक व आकर्षण वाटे. असे करता करता गोरोबांचा प्रपंच आता परमार्थमय झाला होता. ते सकाळी उठून अंघोळ करून, देवाची पूजा करत. नंतर नामस्मरण करावे, ध्यानात पांडुरंगाचे रूप साठवून त्याला मनी-मानसी मुरवून घ्यावे आणि मग न्याहारी करून कामाला लागावे, असा त्यांचा दिनक्रम असे. दुपारचे जेवण झाल्यावर गोरोबा घराच्या ओसरीवरच्या खांबाला टेकून देवाचे नामस्मरण करीत, अभंग म्हणत विश्रांती घेत. त्यामुळे त्यांच्या चित्ताला समाधान मिळत असे. पुन्हा लगेच मोठ्या जोमाने कामाला लागत. दिवस मावळल्यानंतर हातपाय धुऊन पुन्हा घराच्या ओसरीवर एकतारीवर चिपळ्याच्या साथीने भजन सुरू होई आणि रात्रीच्या जेवण्याचेवेळी ते थांबे. रात्रीचे जेवण झाल्यानंतर पुन्हा भजन सुरु होई. शेजारपाजारची मंडळीही त्यात सामील होत असत. नंतर परमेश्वराचे नामस्मरण करीतच झोपी जात. संतशिरोमणी गोरोबाकाका पायाने चिखल तुडवित असत. त्यांचे सर्व ध्यान पांडुरंगचरणी लागलेले असे. ते जरी संसारात दंग होते; तरी विठ्ठलभक्ती आणि विठ्ठलाचे नामस्मरण हेच त्यांचे जीवन झाले होते. पांडुरंगाच्या नामस्मरणात ते आपली तहानभूक हरपून जात. स्वदेहाचे भानच त्यांना राहत नसे. संत नामदेवजी महाराज गोरोबा काकांच्या या तन्मयवृत्तीबद्दल आठवीत

वरा रखुमाईच्या।।
प्रेमे अंगी असे झाकुनी
करीत भजन विठोबाचे।।"

एके दिवशी संत गोरोबाकाका देहभान हरपून अभंग म्हणत माती तुडवीत होते. त्यांचे सर्व ध्यान ईश्वरचरणी लागले होते. अशावेळी त्यांची बायको- संती मुलगा- मकरेंद्राला ठेवून म्हणाली- धनी, बाळावर जरा लक्ष ठेवा. घरी त्याला सांभाळण्यास कोणी नाही. असे सांगून ती पाणी आणण्याकरिता निघून गेली. गोरोबाकाका चिखल तुडवित असताना बाळ रांगत रांगत पित्याकडे गेले अन् ते खेळत खेळत बापाचा पाय धरून उभा राहण्याचा प्रयत्न करू लागले. हसत हसत पित्याच्या पायाला धरता धरता ते चिखलात पडते. गोरोबाकाका डोळे मिटून मन देवस्वरूपी एकाग्र झाले असताना त्या चिखलात त्यांचा एकलुता एक मुलगा पायाखाली आला. ते चिखलासवे मुलालाही तुडवू लागले. त्याचा व्हायचा तो अटळ परिणाम झाला. त्याविषयी संत एकनाथजी महाराज सांगतात-

अशाप्रकारे मुलाचे रक्तमांस, हाडे चिखलात मिसळली. मुलाचा प्राण ताबडतोब गेला. मुलाच्या रक्तमांसाने चिखल रंगला. परमेश्वर भक्तीत तन्मय असलेल्या गोरोबांना बाळाचा स्पर्शही जाणवला नाही. संती पाणी घेऊन घरी आली. पण तिला दारात मूल दिसले नाही. पाण्याची एक घागर डोईवर व दुसरी कमरेवर ठेवून ती सगळीकडे बाळाचा शोध घेऊ लागली. पण बाळाचा शोध कुठे लागेना! तिने गोरोबांना विचारले, धनी, आपला बाळ कुठे आहे? परंतु गोरोबांचे लक्ष संतीकडे नव्हतेच, ते परमेश्वराच्या नामस्मरणात दंग होते. संतीने गोरोबांना खूप विचारले पण त्यांना सांगता आले नाही. शेवटी ती मनात दचकली आणि तिची नजर चिखलाकडे गेली. आपला बाळ चिखलात तुडविला गेला आहे, हे तिच्या लक्षात आले. संतीने आक्रोश सुरु केला. बायकोचा आक्रोश कानावर येताच गोरोबा ध्यानावर आले. संती रागारागाने गोरोबाला बोलू लागली. याचे संत नामदेवजी आपल्या शब्दात वर्णन करतात-

"जळो हे भजन तुझे आता।
डोळे असोनिया जाहलासी
का रे बाळराया तुडविले।"

संतीच्या आकांताने मूल आपल्या पायाखाली तुडविलेले गेले आहे, हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांना या गोष्टीचे अत्यंत वाईट वाटले. त्यांच्या अंत:करणाला खूप वेदना झाल्या. हातून झालेली चूक दुरुस्त करता येणारी नव्हती. परंतु संतीने विठ्ठलाविषयी जे अनुद्गार काढले, त्याने ते खवळले. त्यांनी तिला हातातील चिपळ्या फेकून मारल्या आणि चाकाचे दांडके काढून मारायला धावले. त्यावेळी तिने त्यांना विठ्ठलाची आण घातली. मारता मारता ते थबकले. तिचा आकांत सुरूच होता. शेजारपाजारचे पुरुषबायका जमा झाले व गोरोबांना दूषण देऊ लागले. संती तर माझा बाळा कुठे आहे? माझा बाळा कुठे आहे, म्हणून छाती बडवून घेत होती. हा सगळा प्रकार आता त्यांना उमजला अन् गोरोबा संतीला म्हणाले, कारभारणी, माझ्या हातून फार मोठी चूक झाली म्हणून त्यांनी आपल्या बायकोची क्षमा मागितली.

काही दिवस गोरोबा-संतीचा अबोला चालला, कोणीही कोणाशीच बोलेना चालेना! एके दिवशी संतीने असा विचार केला की, असा अबोला धरून आपला संसार कसा चालणार? संतीला मुलाची आणि मातृत्वाची ओढ होती. उगीच आपण धन्याला विठ्ठलाची आण घातली. त्यामुळेच त्यांनी प्रपंचाविषयी विरक्ती स्विकारली, संसारापासून दूर जाऊ लागले असे तिला वाटू लागले. गोरोबा संसारात उदास राहून परमेश्वरात आणि त्याच्या नामस्मरणात अधिक एकरूप होऊ लागले. गोरोबांची संसाराविषयीची उदासीनता तिला सहन होत नव्हती. एक वंशाचा दिवा गेला, आता वंशाला दुसरा दिवा हवा. एक वर्ष होऊन गेले तरी त्यांनी संतीच्या अंगाला स्पर्श केला नाही. दुरुनच बोलणे, वागणे सुरू होते. संतीसारखी भावूक मनाची प्रेमळ, संसारी स्त्री हा दुरावा किती दिवस सहन करणार? तिने आपल्या बहिणीलाच सवत करून घेतले. रामी ऊर्फ राणी आणि संत गोरोबाकाका यांचा विवाह आनंदात पार पडला. परंतु गोरोबांनी संतीप्रमाणे रामीलाही स्पर्श केला नाही. तिच्या हितासाठी संतीने एक युक्ती योजिली. संतीने काय करायचे ते रामीला समजावून सांगितले. एका रात्री दोघींनी मिळून त्याप्रमाणे विचार केला आणि गोरोबा दिवसभर नामस्मरण व भजन करून शांतपणे झोपी गेले. तेव्हा संती आणि रामी संत गोरोबांच्या दोन्ही बाजूस झोपल्या. संतीने ठरल्याप्रमाणे गोरोबांचा एक हात तर रामीने दुसरा हात उचलून आपापल्या छातीवर ठेवला व दोघीही शांतपणे झोपी गेल्या. पहाटे त्यांना जाग आली, तेव्हा गोरोबा पाप, महापाप... म्हणत झटकन् उठले. अरेरे! घात झाला, आपणच आपल्या हातांनी विठ्ठलाची शपथ मोडली, असे त्यांना वाटले. संत नामदेव महाराजांनी गोरोबांच्या या स्थितीचे वर्णन असे केले- ले दोन्ही हात मनगटापासून तोडून घेतले. गोरोबांच्या या सर्व कृतीतून आपल्या माणसाबद्दलची आत्मीयता आणि भक्ती मार्गावरील अढळ श्रद्धा किती प्रभावी होती, हे स्पष्ट संतशिरोमणी गोरोबांनी आपल्या पारंपरिक व्यवसायाचा त्याग केला, संतीने आणि रामीने त्यांचे मोठेपण मान्य केले व त्या दोघी संसार करू लागल्या, पण गोरोबांनी वैराग्यवृत्ती धारण केल्याने घरात धन-धान्याची कमतरता भासू लागली. दोघी चिंतातुर होऊन कसाबसा संसार सावरू लागल्या. मात्र शेवटी भक्ताच्या संसाराची काळजी परमेश्वरालाच असते नाही का?कुंभारवेशात देव त्यांच्या घरी काम करू लागले. नानाप्रकारची मडकी घडू लागले. प्रेमाने भक्ताच्या घरी काम करु लागले (भाविकांनी ही मूळ कथा ब्रह्म-वैवर्त्य पुराणात पहावी.) गरुड माती वाही. विठ्ठल चिखल तुडवी. रुक्मिणी पाणी भरी अन् विठ्ठल चाकावर नाना प्रकारची गाडगी-मडकी तयार करु लागले. भगवंत विठ्ठल आपल्या भक्ताच्या नानाप्रकारची कलाकुसरीची मडकी तयार करु लागला आणि ती गाडगी मडकी जाळ्यामध्ये बांधून विठ्ठल आणि रुक्मिणी आसपासच्या गावी बाजारात विकू लागले. विठ्ठलाने कुंभारवेषात तयार केलेली मडकी घेण्यासाठी आसपासच्या गावातील व तेरमधील स्त्रिया येऊ लागल्या. स्त्रिया विठ्ठलरुपी कुंभाराचे कौतुक करू लागल्या. संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांनी भक्ती आणि नामस्मरण या साधनांच्याद्वारे करणी करेल तो नरका नारायण होईल म्हणजेच "विठ्ठल भक्तच विठ्ठल होऊन गेले" अशी ही पंढरीच्या पांडुरंगाची किमया त्यांनी सर्वांना पटवून दिली. संत गोरोबा संत-मंडळात वडील होतेच इतकेच नव्हे तर महाभागवतानाही आदरणीय, वंदनीय होते. संत गोरोबा विरागी पुरुष होते. अनंत, निर्गुण, निराकार अंश परब्रह्माचे लौकिक रुप म्हणजे "गोरोबा" म्हणून सर्व संत त्यांना "काका" उपाधी बहाल करतात. पंढरीच्या पांडुरंगाचे नाम महात्म्य सांगताना संत गोरोबा हा त्यांचा पारमार्थिक भाव होता. त्यांनी भागवत धर्माची प्रतिज्ञा भक्तीचा प्रचार व प्रसार करणे. त्यांनी स्वतःचा पारंपारिक कुंभार व्यवसाय करीत संसारही केला आणि संतपणाही सांभाळीत भागवत धर्माची प्रतिज्ञा पार पाडली. भागवत धर्माच्या या प्रतिज्ञेशिवाय पंढरीचा वारकरी मनुष्यच ठरत नाही. जो उगवला दिवस देवाला स्मरुन सार्थकी लावतो तोच वारकरी ठरतो. मग तो आपल्या घरीदारी, नियत कर्तव्यकर्मात, अरण्यात, डोंगर दऱ्याखोऱ्यात कोठेही असो. जे स्वार्थनिष्ठ, लोभी ते वारकरी संत नाहीत. संत शिरोमणी गोरोबाकाका यांची अभंग संख्या कमी असली तरी अभंगवाणीत आढळणारी उत्कटता, भावसमृद्धी यामुळे संतमेळ्यातील त्यांची अभंगरचना त्यांच्या कर्तृत्वाची ग्वाही देणारी आहे. इतकेच नव्हे तर त्यांचे अभंग त्यांच्या जीवनाशी निगडीत आहेत. त्यांच्या अभंगवाणीतून साक्षात्कार, आत्मसाक्षात्कार, उत्कट भक्तीचा अनुभव, अनुभवाची संपन्नता, पवित्र आणि समृध्द असा ज्ञानानुभूतीचा प्रत्यय ही त्यांच्या अभंगवाणीतून प्रत्ययास येतो. अद्वैताचा हा अवर्णनीय आनंद आपल्या दरिद्री प्रपंचात राहूनच त्यांनी प्राप्त केला आहे. अभेदाचे बौध्दिक ज्ञान वेगळे, हे सुखाचे सुख, हे भाग्याचे सौभाग्य, हा अत्यानंदाचा आनंदकंद, गोरोबाकाका आपल्या भक्तिभाव बळावर मिळवू शकले. "मौनं सर्वार्थ साधनम्" असे ब्रीद उरी बाळगणाऱ्या शीलवान कर्मयोग्यास अवघे पन्नास वर्षाचे आयुष्यमान लाभले होते. संत गोरोबाकाकांनी अनंत काळाला आपल्या जीवनचरित्राचा आणि कार्याचा, कर्तृत्वाचा जो आदर्श निर्माण केला होता तो इतिहासाला कदापिही विसरता येणार नाही. नामाचा गजर करुन दि.२० एप्रिल १३१७- शके १२६७ साली कृष्णपक्ष त्रैयोदशीस दुपारच्या समयी तेर येथे गोरोबाकाकांनी समाधी घेतली.

# मच्छिंद्र गडाच्या फिरत्या नारळी सप्ताहाची सांगता हिवरापहाडी येथे शनिवारी काल्याच्या कीर्तनेने होणार

**वादळवार्ता/बीड** बीड तालुक्यातील हिवरा पहाडी येथे ह .भ.प . गुरुवर्य स्वामी निगमानंदजी महाराज श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड निमगाव यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली ४६ वा वार्षिक नारळी अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात दिनांक १३ एप्रिल शनिवारी झाली असून या सप्ताहाची सांगता ह .भ.प . गुरुवर्य जनार्दन स्वामी महाराजां यांच्या काल्याच्या कीर्तनाने दिनांक २० एप्रिल रोजी शनिवारी होणार आहे . भाविक भक्ताने या नारळी सप्ताहाचा लाभ घ्यावा असे ग्रामस्थांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे . बीड तालुक्यातील हिवरा पहाडी हे डोंगरी भागात कुंडलिका नदीच्या काठी वसलेले गाव असून या पूर्वी २००५ साली या ठिकाणी नारळी सप्ताह झाला होता या ठिकाणी ह .भ.प . गुरुवर्य स्वामीं निगमानंद महाराज श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड तालुका शिरूर यांच्या आशिर्वादाने ४६ वा फिरता नारळी सप्ताहाची सुरुवात दिनांक १३ एप्रिल शनिवार रोजी अनेक संत महंतांच्या उपस्थितीत झाली असून या सप्ताहात ह .भ. प . रतन महाराज सासुरा, . ह .भ.प . महादेव महाराज चाकरवाडी ह .भ . प . जयवंत महाराज बोधले ह .भ . प . उद्धव महाराज चोले ह .भ . प .संदीपान महाराज हासेगाव ह .भ . प . उद्धव महाराज मंडलिक ह .भ . प . अर्जुन लाड यांच्यासह अनेक मान्यवर महाराजांचे कीर्तन व प्रवचन होत असून यासह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत . ह .भ . प . गुरुवर्य जनार्दन स्वामी महाराज श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड निमगाव यांचे दिनांक २० एप्रिल रोज शनिवार काल्याच्या कीर्तनाने या नारळी सप्ताहाची सांगता होत आहे . या सप्ताहात विविध भागातील अनेक दानशूर अन्नदात्यांनी अन्नदानाचे पवित्र कार्य हाती घेतले आहे . भाविक भक्तांनी या सप्ताहाच्या लाभ घ्यावा असे सप्ताह कमिटीच्या वतीने कळवण्यात येत आहे .



# स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभ संपन्न डॉ. टी. पी. लहाने, डॉ. दिपक कटारे यांची प्रमुख उपस्थिती

**वादळवार्ता/अंबाजोगाई** स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या २०१८ च्या बॅचचा पदवी प्रदान समारंभ मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त संचालक पद्मश्री डॉ. टी. पी. लहाने, प्रख्यात -हदयरोग तज्ज्ञ डॉ. दिपक कटारे, संभाजी नगर येथील हेडगेवार रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. तुपीकर, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या २०१८ च्या एमबीबीएस बॅचचा पदवीप्रदान समारंभ दि.१५ एप्रिल रोजी येथील आर्यवीर मंगल कार्यालयाच्या लॉन्सवर मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. यावेळी प्रसिद्ध नेत्रतज्ञ तथा वैद्यकीय शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त संचालक पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धापटे, छत्रपती संभाजीनगर च्या हेडगेवार रुग्णालयाचे माजी संचालक डॉ.तुपीकर व प्रख्यात हृदयरोगतज्ञ डॉ. दीपक कटारे यांना या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. हा कार्यक्रम स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी आयोजित व संचालित केला होता. या कार्यक्रमासाठी सर्व पदवीधर विद्यार्थ्यांचे पालक व कुटुंबीय, तसेच ज्येष्ठ-कनिष्ठ वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सर्व प्रमुख पाहुण्यांच्या सत्काराने झाली. डॉ. तात्याराव लहाने सरांनी आपल्या भाषणात स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांना सांगितला. त्यांनी विद्यार्थ्यांना रुग्ण व त्यांच्या कुटुंबाशी कसे वागावे हे समजावून सांगितले आणि डॉक्टर म्हणून आपल्या प्रवासात आपल्या पालकांना विसरू नये असे आवाहन केले.

अधिष्ठाता डॉ. शंकर धापटे म्हणाले की, आता तुम्ही सर्व पदव्युत्तर शिक्षणा साठी जाणार आहात आणि सर्व विषयांना सारखे महत्त्व आहे, त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे अभिनंदन केले.

प्रख्यात -हदयरोग तज्ञ डॉ. दीपक कटारे यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना अभिनंदन केले आणि वर्षानुवर्षे वैद्यकीय पद्धत कशी बदलत आहे व वैद्यकीय व्यवसायातील सध्याच्या आव्हानांवर चर्चा केली. जीवनातील सकारात्मक दृष्टिकोन आणि डॉक्टरांच्या सामाजिक जबाबदाऱ्यांवर सर्व वक्त्यांनी भर दिला. कार्यक्रम हिप्पोक्रेटीसच्या शपथविधीने संपन्न झाला.



जरुड बोरफडी रोडवर कुटेवाडी नजिक वादळाने बाभळीचे झाड उपटून रस्त्यावर पडल्याने काही काळ वाहतुक ठप्प झाली होती

# धारुर शहरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात व विवीध कार्यक्रमांनी साजरा.

**वादळवार्ता/किल्ले धारूर**

धारुर शहरात श्रीराम नवमी निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.शहरात भव्य मोटारसायकल रॅलीने श्रीरामांचे जयघोषात शहर दुमदुमले.सांयकाळी शहरातून वाजता गाजत सजलेल्या रथात श्रीराम प्रतीमेची मिरवणुक काण्यात आली.

धारूर शहरात श्रीरामनवमी उत्साहात व विवीध कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. अंबाचौंडी मंदीर रस्त्यावरील श्रीराम मंदिर,कटघरपूरा श्रीराम मंदीर, जोड आड गल्ली श्रीराम मंदीर, श्री हनूमान मंदीर मेन रोड आदी ठिकाणी दुपारी श्रीराम मंदीर जन्मोत्सव साजरा साजरा करण्यात आला. सकाळी श्रीराम भक्तांनी शहरातून भव्य मोटरसायकल फेरी काढली श्रीरामाचे जयघोषाणे शहर दुमदुमले होते. सायंकाळी सजलेल्या रथात श्रीरामाची प्रतिमा ठेवून वाजता गाजत भव्य मिरवणुक काढण्यात आली. श्रीराम भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




# डॉ .आंबेडकर जयंती निमित्त आयोजित रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**वादळवार्ता/परळी**

विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त परळी उपजिल्हा रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उन्हाळ्यात रक्ताचा नेहमीच तुटवडा भासत असतो अशा परिस्थितीत या रक्तदान शिबिराचे महत्त्व अत्यंत महत्व असल्याचे प्रतिपादन डॉ .रूपाली मुंडे यांनी केले.

परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात दिनांक १८ एप्रिल रोजी फुले , शाहू, आंबेडकरी चळवळीचे मुखपत्र दैनिक सम्राट च्या वतीने डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या रक्तदान शिबिराचे उद्घाटन परळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर अरुण गुट्टे ,डॉ .दिनेश कुर्मे यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयातील डॉ .रूपाली मुंडे ,डॉ .वैभव देशमुख ,माजी नगरसेवक महेंद्र रोडे ,एकतावादी रिपाईचे प्रदेश सचिव पंडितराव झिंजुर्डे, साहित्यिक अजयकुमार गंडले ,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, प्रा .विलास रोडे,मनसेचे तालुका प्रमुख श्रीकांत पाथरकर, वंचित चे तालुकाध्यक्ष गौतम साळवे ,सामाजिक कार्यकर्ते राहुल घोबाळे,शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर ,पत्रकार मोहन व्हावळे , एकतावादी रिपाईचे शहराध्यक्ष सुनील कांबळे,पत्रकार संभाजी मुंडे ,पत्रकार जगदीश शिंदे ,पत्रकार विजय रोडे आदी उपस्थित होते .

याप्रसंगी डॉ .रूपाली मुंडे ,साहित्यिक अजयकुमार गंडले, महिंद्र रोडे यांनी आपले विचार मांडले. या रक्तदान शिबिरात पंडितराव झिंजुर्डे ,जगदीश शिंदे ,विकास वाघमारे ,जनार्धन गीते ,गोविंद राठोड ,ऋषिकेश बारगजे यांच्यासह परळी शहरातील अनेक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले .या कार्यक्रमास मनसेचे शहर उपाध्यक्ष विठ्ठलराव झिलमेवाड, प्रशांत कामाळे ,वंचित बहुजन आघाडीचे युवा शहराध्यक्ष प्रेम जगतकर, राजेश सरवदे , मारोती वाघमारे, नवनाथ दाने, सम्राट गायकवाड,अंबाजोगाई शासकीय रुग्णालयातील ब्लड बँकेतील आनंद सिताफ, बाबा शेख ,सय्यद नजीर ,मुस्कान शेख ,ऋतुजा शामली तसेच परळी उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.या रक्तदान शिबिराचे प्रास्ताविक संयोजक रानबा गायकवाड यांनी केले .सूत्रसंचालन प्रा .डॉ.सिद्धार्थ तायडे तर आभार प्रदर्शन पत्रकार भगवान साकसमुद्रे यांनी केले.

# बजरंग सोनवणे यांच्या साठी सोनी जवळा गावातील बहुसंख्य मतदार एकटावले

**वादळवार्ता/केज** सध्या बीड लोकसभेची रणधुमाळी सुरू आहे, या निवडणुकी च्या प्रचारा साठी बजरंग सोनवणे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षा कडुन उमेदवारी जाहीर झाल्या पासुन रात्री चा दिवस करत आहेत, मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत आणि बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ मुलगा सौरभ बजरंग सोनवणे व बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळाचे अध्यक्ष शिवाजी चौधरी यांनी बीड लोकसभेतील गाव भेटी दौरा सुरू केला आहे, मौजे सोनिजवळा येथे सौरभ सोनवणे हे आले आसता सोनिजवळा येथील नागरिकांनी एकच निर्धार केला कि बजरंग सोनवणे यांना दिल्लीला पाठवायचे व गावातुन भरभरून मतदान रूपी आशीर्वाद देयचा बाप्पांना खासदार करायचे या वेळी सोनिजवळा गावातील मा.सरपंच. मुकुंद गायकवाड, उपसरपंच पति दादासाहेब कोकाटे, चेअरमन मनोहर गिरी, व्हा.चेअरमन हुसेन पटेल ,राम गायकवाड , संचालक सुनिल ससाणे , शाम ससाणे, सचिन ससाणे, प्रकाश ससाणे , सोपान ससाणे, साहेबराव भंडारे, प्रमोद महाजन, अरुण भांडवलकर, संतोष थोरात, भागवत कोकाटे, जेष्ठ,तरुण



सर्व कार्यकर्ते उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब कोकाटे यांनी केले तर आभार असेफ पठाण केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुकुंद गायकवाड, बाळासाहेब कोकाटे, मनोहर गिरी, सुनिल ससाणे यांनी परीश्रम घेतले

# समाजवादी गणराज्य पार्टीचा अकोल्यात बाळासाहेब आंबेडकर यांना पाठिंबा !

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर अकोला लोकसभेची निवडणूक लढत आहेत. आज समाजवादी गणराज्य पार्टीचे अध्यक्ष आमदार कपिल पाटील यांनी आज यशवंत भवन, अकोला येथे प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन समाजवादी जनता परिवाराच्यावतीने त्यांना समर्थन आणि सक्रीय पाठिंबा जाहीर केला.



# श्रीराम जन्मोत्सवा निमित्त मिरवणुक उत्साहात

## हजारो रामभक्त युवकांचा सहभाग ; श्रीरामाच्या मुर्तीचे भाविकांनी घेतले दर्शन

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

अंबाजोगाई शहरात रामजन्मोत्सवा निमित्त्याने भव्य मिरवणुक मोठ्या उत्साहात काढण्यात आली मिरवणुकीत हजारो रामभक्त युवकांचा सहभाग होता या निमित्ताने शहरात भगवे ध्वज,पताका, विद्युत रोषणाई करण्यात आली होती. शहरातील पुरातन राम मंदीरात जन्मोत्सव सोहळा पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. शहरातून रामभक्तांच्या वतीने भव्य मिरवणुक काढण्यात आली पाटील चौक भागातील राममंदीर येथून या मिरवणुकीस प्रारंभ होऊन शहरातील विविध महत्वपुर्ण चौक, मुख्य रस्ते आदी ठिकाणाहून या मिरवणूकीने मार्गक्रमण केले. यावेळी भव्य अशा श्रीरामांच्या भव्य आकर्षक मुर्तीचे भक्तांनी दर्शन घेतले. या मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अंबाजोगाईत राम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त पारंपारीक राम मंदिरात जन्मोत्सव तसेच पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला या निमित्त्याने शहराच्या धार्मिक वैभवात भर पडली तसेच वातावरण भक्तीमय झाले विशेष म्हणजे शहरातून निघालेली भव्य मिरवणूक शहराचे प्रमुख आकर्षण होती, प्रभु रामचंद्रांच्या मुर्तीचे विधिवत पुजन करून या मिरवणूक सोहळ्याला प्रारंभ झाला.

श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले असता मोठया संख्येने युवक भगवे ध्वज घेवून मिरवणूकीत समुहाने सामील झाले होते.हे युवक अधिक आकर्षण ठरले. विविध रामगीतांच्या गाण्यावर अभिनय आणि नृत्य करून आपल्या हातातील ध्वज हवेत उंचवून नागरिकांचे लक्ष वेधत होते. मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणच्या रस्त्यावर रांगोळ्या काढून भगव्या पताका, ध्वज, फलक, लावुन मिरवणुकीचे शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.



# जिल्ह्यात वादळी वा-यासह पाऊस अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली

नेकनूर/शेख शाकेर  बुधवार दिनांक १७ रोजी बीड शहरासह जिल्ह्यातील अनेक भागात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला या पावसामध्ये फळबागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या वादळी वाऱ्याने काही भागातील झाडे उन्मळून पडल्याने विधुत पुरवठ्यावर चांगलाच परिणाम झाला. तर प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार आणखी दोन दिवस पावसाचं शक्यता वर्तवली आहे. बुधवारी दुपार नंतर ढगाळ वातावरण आणि काही वेळातच वादळी वारे आणि गडगडाटासह जोरदार पाऊस सुरु बीड व परिसरात तब्बल दीड तासापर्यंत अधून मधून जोरदार पाऊस सुरू होता गेल्या काही दिवसापासून ढगाळ वातावरण असल्याने आज पुन्हा एकदा अवकाळीने तडाखा दिला मागील आठवड्यात बीड जिल्ह्यात झालेल्या वादळी वाऱ्याने गारपीट मुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याचे नुकसान झाले होते या गारपिटीमुळे आंबा फळभाज्या आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आंब्याच्या झाडाखाली कैर्यांचा खच साचला होता त्यातच आज बुधवारी पाचच्या दरम्यान वादळी वाऱ्यासह



जोरदार पाऊस झाला बीड शहर आणि परिसरात तासभर वरजिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अधून मधून जोराचा पाऊस सुरू होता यासोबतच जिल्ह्यातील काही भागांमध्ये पाऊस झाल्याचे वृत्त आहे शहरातील नेकनूर भागात आणि जिल्ह्यातील काही भागात झाडे उन्मळून पडली काही ठिकाणी विजेचे पोल देखील वाकल्याने त्या भागातील वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार आज आणि उद्या जिल्ह्यात गडगडाटासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. आमचे नेकनूर येथील वार्ताहर कळवतात की मोठ्या प्रमाणात पाऊस झाला गेल्या दोन-तीन दिवसापासून उष्णतेने आपले रौद्ररूप दाखवून तापमानाचा पारा ४० ते ४१ अंशावर पहावयास मिळाल्याने माणसांसह प्राणी व पक्ष्यांची ही अंगाची लाही लाही होत होती परंतु काल अचानक दुपारनंतर पाच ते सहा च्या दरम्यान पावसाने हजेरी लावल्याने वातावरण थंड झाले मात्र या पावसाबरोबर भयंकर असे वादळही आल्याने अनेकजणांच्या घरावरील, जनावरांच्या गोठ्यावरील पत्रे उडून गेले, शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेले आंब्याचे पीक ५० ते ७५ टक्के आंब्याचा ढीग झाडाखाली पहावयास मिळाला. त्याचबरोबर कित्येक झाडेही उन-मळून पडल्याने आता या शेतकऱ्यांनी काय करावे? असा प्रश्न निर्माण झाला असून निसर्गाने खूप नुकसान मात्र शेतकऱ्यांचेच होते. आणि जर कधी पीक भरघोस आलेच तर त्याच्या शेतमालाला भाव राहत नाही. म्हणून शेतकऱ्यांनी जगावे की मरावे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकल्याने शेतकरी हवालदिन झालेला पहावयास मिळत आहे. नेकनूर येथे पांढरा ची वाडी येथे वादळी वाऱ्याच्या पाऊस सुरू असताना वीज पडून दिलीप उत्तम शेळके या शेतकऱ्याचे ४ जनवारा,२ गायी, वासरू आणि१ शेळी दगावाल्याची माहिति आहे, वादळी वाऱ्यासह पावसामुळे अतिशय मोठ्या प्रमाणात नुकसान,आनंदवाडी घाट येथे शेडचे मोठ्या प्रमाणात नुकसानबळीराम सुंदरराव वळे यांच्या,व चे नेकनूर विश्वनाथ सातपुते यांचे शेडचे नुकसान मोठ्या प्रमाणे झाले आहे रघुनाथ सातपुते ड्रॅगन फ्रुट यांच्या मोठे प्रमाणे नुकसान झाली आहे,नेकनूर अतिक भाई भुसार वाले यांचा केळीचा बाग व अंबेचा बाग मोठ्या प्रमाणे नुकसान झाला आहे . ताल्काळ पंचनामा करण्यात यावा महाराष्ट्र शासन, सय्यद साजेद अली (बाबुभाई )यांची मागणी आहे, हाफिज वाजेद, रघुनाथ सातपुते, संतोष पवार ,हनुमंत वडे, विश्वनाथ तथा आमचे प्रतिनिधी शेख शाकेर यांनी छायाचित्र काढण्यात आली आहे

# पाच वर्षे देऊन बघा ; बीड जिल्हयाचं भविष्य उज्ज्वल केल्याशिवाय राहणार नाही

## जाटनांदूर, येथील जाहीर सभेत पंकजाताई मुंडे यांचे आवाहन

## जिल्हयाचा खरा विकास पंकजाताईमुळेच ; त्यांना खंबीर साथ द्या - आ. सुरेश धस



**वादळवार्ता/शिरूर कासार** लोकसभा निवडणूक एक प्रकारे महायुद्ध आहे आणि हे महायुद्ध आहे म्हणूनच मला उमेदवारी मिळाली आहे. या निवडणुकीत सर्वांना सोबत घेऊन त्यांना दिलेला शब्द पाळण्यासाठी पक्षाने मला उमेदवारी दिली आहे, त्यामुळे मला पाच वर्षे देऊन बघा, जिल्हयाचं भविष्य उज्ज्वल केल्याशिवाय राहणार नाही असं आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यानी जाहीर सभांमधून मतदारांना केलं आहे. पंकजाताई मुंडे यांनी कायम समाज हिताची कामे केली.राज्य मंत्रिमंडळात चार खात्यांची जबाबदारी सांभाळताना त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी भरघोस निधी दिला, त्यामुळे भविष्यातही बीड जिल्ह्याला विकासाच्या उंचीवर नेण्यासाठी पंकजाताईंच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

पंकजाताई मुंडे यांनी प्रचाराचा तिसरा टप्पा आज जाहीर सभांच्या माध्यमातून सुरू केला असून जाटनांदुर, येथे आज त्यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर आ. सुरेश धस यांच्यासह शिरूर कासारचे नगराध्यक्ष रोहिदास पाटील, विजय गोल्हार, दत्ता काकडे, शैलजा गर्जे, वाल्मिक निकाळजे, अमोल तरटे, वारे मामा, सरपंच सचिन माने, ज्योतीताई दहातोंडे, अरुण भालेराव, रामदास बडे, चंपावती पानसंबळ, हनुमंत डोंगर, राजेंद्र चव्हाण, ज्ञानदेव डोंगर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या, शौर्याबरोबरच स्त्रियांमध्ये धैर्यही असते. एखाद्याला एकदा शब्द दिला की, मान कापून देऊ पण शब्द मागे घ्यायचं नाही हे मला मुंडे साहेबांनी शिकवले आहे. आजपर्यंत राजकीय जीवनात असताना मी असंख्य वेळा भाषणे केली; परंतु या भाषणादरम्यान मी केलेले वक्तव्य मला मागे घ्यायची कधीच वेळ आली नाही. मी प्रत्येकवेळी दिलेला शब्द पाळते. ग्रामविकास मंत्री असताना बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सुरेश धस यांनी त्यांच्या गटातील पाच जि.प. सदस्य मला दिले, तेव्हा बीड जि.प.भाजपाच्या ताब्यात आली होती. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यात विकासाच्या योजना त्यावेळी राबवता आल्या होत्या. या दरम्यान मी सुरेश धस यांना आमदारकीचा शब्द दिला होता अर्थात त्यामागे त्यांचीही शक्ती होती पण एकदा शब्द दिला की मी मागे घेत नाही असे त्या म्हणाल्या.

### जनतेची सेवा करताना कधी जात बघत नाही

जिल्ह्याच्या विकासाला पुढे घेऊन जाण्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची आहे. दिल्लीत मी 'आदरणीय मोदीजी म्हणून हाक मारली तर बोलो पंकजा' म्हणून प्रतिसाद देण्यासाठी तुमचे मताधिक्य मला आवश्यक आहे. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी मी मते मागत आहे. या जिल्ह्यातील बहाद्दर जनता कायम विकासासोबत चालणारी आहे, याचा मला विश्वास आहे असे सांगत त्या म्हणाल्या, परभणी,नांदेड लातूर असो की अन्य ठिकाणी महायुतीचे उमेदवार प्रचारासाठी मला येण्याचा आग्रह धरतात, कारण मी एक सर्व समावेशक चेहरा आहे याची जाणीव त्यांनाही आहे. माझ्यासमोर येणाऱ्यांना कधीही त्याची जात विचारत नाही. येणाऱ्या प्रत्येकाचे काम माझ्याकडून होईल का, यासाठी मी प्रयत्नशील राहते असे त्या म्हणाल्या.

### मागे वळून पहा,मी केलेली कामेच दिसतील

तुम्ही मागे वळून पहा, तुमच्या गावासह वाडी- वस्ती-तांड्यासह ग्रामपंचायतमध्ये जा. तेथील विकास कामे दिसल्यानंतर तुम्हाला पंकजा मुंडेंची आठवण येईल. ज्या गावात मला 50 मते मिळाली आणि ज्या गावात 50 मते बाजूला गेली, तेथेही मी सारखीच विकास कामे केली. मंत्री असताना विकास कामात कधीही भेदभाव केला नाही. समोरचा माणूस कोणत्या पक्षाचा आहे हे मी पाहिले नाही,तर तो आपल्या राज्याचा आणि माझ्या जिल्ह्याचा आहे असे मी मानते. त्यामुळे जिल्ह्याच्या उज्वल भवितव्यासाठी आणि विकासाला पुढे घेऊन जाण्यासाठी मला निवडून द्या असे आवाहन पंकजा मुंडे यांनी केले.

### विनाकारण राजकारण आणू नका

पंकजाताई मुंडे म्हणाल्या, ज्या गोष्टी कायद्याने मिळणार आहेत, त्या गोष्टीत राजकारण आणण्याची काहीही गरज नाही. मी कितीही म्हटले तरी कायदा बदलत नसतो. त्यामुळे या निवडणुकीत कृपा करून राजकारण आणू नका असे आवाहन त्यांनी केले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक ग्ु राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )